RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act, 1994.)"

Office of the Controller of Examinations
(Revaluation Section)
Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033

No. RTMNU/Revaluation./2016/ 174 Dated : 16/08/16

# परिपत्रक

## विषय: उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनाकरीता आवेदन करण्याबाबत कार्यपध्दती

या परिपत्रकाव्दारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, संचालित व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, पुनर्मुल्यांकनाकरिता निर्गमित निर्देश क्रमांक १५/२०१५ आणि १६/२०१५ मधील तरतूदीनुसार परीक्षांचे मुळ निकाल जाहिर झाल्यानंतर **पुनर्मुल्यांकनाकरिता विद्यार्थ्यासाठी आवेदन करण्याकरिता ५ दिवस व महाविद्यालयांना विद्यापीठात कागदपत्रे सादर करण्याकरिता ३ दिवसाचा कालावधी निर्धारित करण्यात आला आहे.**

पुनर्मुल्यांकनासाठी आवेदनपत्र 'अ' ऑनलाईन पध्दतीने जमा करणे आवश्यक आहे. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे निर्धारित कालावधीत इंटरनेट लिंक प्रस्थापित करण्यास अडचणी निर्माण झाल्यास **आवेदनपत्र** 'अ' सादर करण्यास विलंब होतो आणि पुढील प्रक्रिया लांबणीवर पडते. त्यामुळे निर्धारित कालावधीत पुनर्मुल्यांकनाचे निकाल जाहिर करण्यास विद्यापीठ प्रशासनास अडचणी निर्माण होतात.

पुनर्मुल्यांकनाच्या कामात विलंब होवू नये व निर्धारित कालावधीत निकाल जाहिर करणे सहज शक्य व्हावे याकरीता खालील प्रक्रिया अमलात आणावी, असे सूचीत करण्यात येत आहे :

१) मुळ निकाल जाहिर झाल्यानंतर पुनर्मुल्यांकनाकरिता निर्धारित **प्रपत्र 'अ'** विशिष्ट कालावधीत म्हणजेच ५ दिवसात ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. परंतु तांत्रिक अडचणीमुळे इंटरनेट लिंक प्रस्थापित न झाल्यास **विद्यार्थ्याकडून मॅन्युअल पध्दतीने (स्वहस्ते) आवेदनपत्र महाविद्यालयांनी स्वीकार करून पुढील ३ दिवसात विद्यापीठात जमा करावे.** निर्धारित कालावधी संपुष्टात आल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत किंवा कुठल्याही सबबीवर **आवेदनपत्र 'अ'** स्वीकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घेवून या संदर्भातील आवश्यक सूचना आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना सुध्दा करून देण्यात यावी. लिंक प्रस्थापित करण्यात अडचण येत असेल तरच स्वहस्ते (मॅन्युअल) पध्दतीने आवेदन स्वीकारण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

२) **आवेदनपत्र 'अ'** सादर केल्यानंतर पुढील **१५ दिवसाच्या** आंत उत्तरपत्रिकेची प्रत संबधित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर आकस्मिक परिस्थिती उद्‌भवल्यास किंवा अपरिहार्य कारणामुळे उपलब्ध न झाल्यास मूळ उत्तरपत्रिकेच्या सत्यप्रतीची (Xerox) वाट न बघता **पुढील ३ दिवसात** निर्धारित शुल्कासह **आवेदनपत्र 'ब'** विद्यापीठात जमा करावे.

सर्व संबधित महाविद्यालयांना याबाबत सुचित करण्यात येते की पुनर्मुल्यांकनाची सर्व कामे महाविद्यालयीन  लिपीकच विद्यापीठाशी संपर्क साधून विद्यार्थ्याच्या वतीने करतील. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष विद्यापीठात येवून याबाबत कोणतीही चौकशी करू नये याबाबतची सुचना संबधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर देण्यात यावी. विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्षपणे कोणतीही माहिती देण्यात येणार नाही याची पूर्वसूचना महाविद्यालयांनी प्रवेशित विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर करून देण्यात यावी.

उपरोक्त सुचनेचे तंतोतंत पालन करून सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे जेणे करून पुनर्मुल्यांकनाचे निकाल निर्धारित कालावधीत जाहिर करून विद्यार्थी वर्गात होणारा असंतोष दूर करणे सोयीचे होईल.

(डॉ. निरज खटी)
परीक्षा नियत्रंक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर.

16/8/16